# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/12/2022 (गुरूवार) दुपार

---

## फसवणुक

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावर मौजा दुयम निबंधक कार्यालय, कळमेश्वर येथे दिनांक २३/११/२००४ चे ११.०० वा. ते १७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिलीप शंकर भुजाडे, वय ४७ वर्ष, रा. हत्तीसरा ता. सावनेर जि. नागपुर याचे वडीलांचे नावावर असलेली मौजा निमजी वेना डॅम्प शिवारातील जमीन भुमान क्र. १८५/५३,१८५/५४,१८५/५५ हया शेतजमीनीचे आरोपी नामे– १). श्री. मनोहर रामचंद्र तारकुंडे, रा. सिल्व्हर ओक अपार्टमेंट काटोल रोड, राजनगर जि. नागपुर २) मिलींद प्रभाकर कोलवाडकर, रा. लक्ष्मी नगर, नागपूर ३) सुभाष बाबुराव जावरे रा. तकीया धंतोली नागपुर ४) अज्ञात इसम यांनी फिर्यादीचे वडीलाचे जागी दुसरा इसम उभा करून दुयम निबंधक कार्यालय कळमेश्वर येथे विक्रीपत्र तयार केले व विक्री पत्रावर बनावट असलेल्या अज्ञात इसमाचे हाताचे अंगुठयाचे ठसे घेतले तसेच फिर्यादीने वडीला जवळ कुठल्याही प्रकारचे ओळखपत्रा संदर्भात कागदपत्र नसल्याबाबत शपथपत्र तयार केले त्यात सुध्दा फिर्यादीचे वडीलांचे जागेवर दुसरा इसम उभा करून शपथपत्र तयार केले. अशाप्रकारे फिर्यादीचे वडीलाचे नावाचे खोटे अंगुठयाचे ठसे व दस्तऐवजचा वापर करून आरोपीतांनी संगनमताने शेतजमीन हडपुन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम ४२०, ४१९, ४६८, ४७१, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मेश्राम मो. नं. ९०७५२४५०५९ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा नेरला शिवार येथे दिनांक ०१/१२/२०२२ चे ०८.३० वा. ते ०९.०० वा. दरम्यान यातील १८ चक्का ट्रेलर क्र. एम. एच.४०/एन.–६७६७ चा चालक आरोपी व मृतक नामे– केशव शामराव काले, वय ३८ वर्ष, रा. स्मॉल फॅक्टरी एरिया नागपुर याने त्याचे ताब्यातील ट्रेलर हे चाचेर नवेगाव येथे अल्ट्राटेक सिमेंट कंपनीत सिमेंट भरण्याकरीता जात असताना नेरला शिवारात त्याचे ताब्यातील १८ चक्का ट्रेलर हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अपघात होवुन अपघातात स्वत: गंभीर जखमी होवुन स्वत:चे मरणास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राकेश गेंदलाल मोहणे, वय ३२ वर्ष, रा. चाचेर ता. मौदा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ४२७, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सदाशिव काठे, ब. नं. ६४३ पोलीस स्टेशन रामटेक ९०११३२६७९३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर